# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड

## Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६११९, २२६१ ४०४१

Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

सभासद बंधू आणि भगिनींनो,

आपणांस कळविण्यात येते की सोसायटीच्या सभासदांकरीता व सेवानिवृत्त सभासदांकरीता कामगार दिनाचे औचित्य साधून १ मे २०२४ पासून फक्त चार महिन्याच्या कालावधीसाठी अमृत मुदत ठेव योजना सूरू करण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी या योजनेचा लाभ घ्यावा

# "अमृत मुदत ठेव योजना"

**ठेव स्विकारण्याचा कालावधी :** दि. ०१ मे २०२४ पासून दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत

सदर अमृत ठेव योजना दि. ०१ मे २०२४ पासून दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये :-**

१. ठेवीचा कालावधी - ३६ महिने

२. व्याजाचा दर - ८.७५% (चक्रवाढव्याज पध्दतीने)

३. ठेव रक्कम - रु. १०,०००/- किंवा रु. १०,००० च्या पटीमध्ये

| ८.७५% चक्रवाढ पध्दतीने वार्षिक व्याज | | | |
|---|---|---|---|
| **महिने** | **मुद्दल** | **व्याज** | **शिल्लक रक्कम** |
| १२ | १०,००० | ८७५ | १०,८७५ |
| २४ | १०,८७५ | ९५२ | ११,८२७ |
| ३६ | ११,८२७ | १०३५ | १२,८६२ |

४. ठेवीची रक्कम धनादेशाव्दारे किंवा एनईएफटि / आरटीजीएस व्दारे स्विकारण्यात येईल.

५. ठेवीवरील व्याज वार्षिक पध्दतीने गणले जाईल व व्याज मुदतठेव रकमेसहित देण्यात येईल.

६. मुदतीपूर्वी रक्कम काढल्यास सरळव्याज पध्दतीने खालीलप्रमाणे व्याज देण्यात येईल.

**११ महिन्यांपर्यंत - व्याज नाही**

**११ महिन्यांच्या पुढे ते २४ महिन्यांपर्यंत - ५.५०%**

**२४ महिन्यांच्या पुढे ते ३६ महिन्यांपर्यंत - ६.५०%**

**मुदत पूर्ण झाल्यानंतर - ८.७५%**

७. अमृत मुदतठेव योजनेत मुदत संपल्यानंतर मिळणाऱ्या व्याजावर आयकराच्या नियमामुसार TDS आकारण्यात येईल.

८. नामनिर्देशन - सभासदाला योजनेत सहभागी होताना वारसाचे नामनिर्देशन करावे लागेल.

९. या योजनेअंतर्गत वेळोवळी बदल करण्याचे अधिकार संचालक मंडळ राखून ठेवत आहे.

| **राजेश पी. सारंग** | **गुरुदत्त डी. आळवे** | **महेश डी सावंत** | **सदानंद के. राणे** |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मानद सचिव | मानद खजिनदार |

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
# Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६११९, २२६१ ४०४१

Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

**सभासद बंधू आणि भगिनींनो,**

आपणांस कळविण्यात येते की, शनिवार दि. २३/०३/२०२४ रोजी संपन्न झालेल्या सोसायटीच्या संचालक मंडळाच्या सभेत सर्वानुमते मंजूर केलेल्या ठरावानुसार मुदतठेवीवरील व्याज दरात वाढ करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे त्याची अंमलबजावणी दि. ०१/०४/२०२४ पासून करण्यात येईल.

१. मुदतठेवीवरील व्याज दर २४ महिन्यांसाठी द.सा.द.शे. ८.३५%

अ. मुदत ठेवीचा कालावधी २४ महिन्यांचा असेल.

ब. मुदत ठेव योजनेत रक्कम गुंतविल्यानंतर १२ महिन्याच्या आत रक्कम परत घेतल्यास द.सा.द.शे. ४.००% दराने व्याज देण्यात येईल.

क. १३ व्या महिन्यानंतर मुदत ठेवीची मुदत पूर्ण व्हावयाच्या आधी रक्कम परत घेतल्यास द.सा.द.शे. ६.००% दराने व्याज देण्यात येईल.

ड. मुदत ठेवीचा २४ महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर नंतरच्या कालावधीसाठी व त्यापुढील कालावधीसाठी द.सा.द.शे. ८.३५% दराने व्याज देण्यात येईल.

ई. मुदत ठेवीसाठी असलेली २४ महिन्याची मुदत पूर्ण झाल्यानंतर सदर मुदत ठेवीचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता नाही. सदर मुदतठेवी स्वयं नुतनीकरण सोसायटीमार्फत करण्यात येईल.

२. काही कर्मचारी सोसायटीचे सभासदत्व स्विकारून महाराष्ट्राबाहेर जातात. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरतेच मर्यादित असल्याने अशा सभासदांनी बदलीबाबतच्या सूचना त्वरीत सोसायटीच्या ई मेल आयडी (mumbaipostsociety@gmail.com) वर सोसायटी कार्यालयाला द्याव्यात व अशा सभासदांना संस्थेच्या पोटनियमातील तरतूदीनुसार सोसायटीची संपूर्ण कर्ज वसुली परतफेड करणे आवश्यक आहे.

३. सहकार खात्याच्या नियमानुसार सभासदाने कर्ज एकाच संस्थेकडून घेणे आवश्यक आहे परंतू असे आढळून येत आहे कि, काही सभासदांनी २ ते ३ सोसायट्यांचे सभासदत्व स्विकारल्याने व कर्ज घेतल्याने त्यांची कर्ज वसुली त्यांच्या पगारातून होण्यास अडचण निर्माण होत आहे त्यामुळे सर्व सभासदांनी वरील नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सर्व सभासदांनी सोसायटीची नियमित वसुली त्यांच्या वेतनातूनच भरणे अनिवार्य आहे. बाहेरून वसुली भरणे टाळावे. सभासदांनी कर्ज वसुली नियमित भरावी व थकबाकी टाळून विनाविलंब सुलभतेने कर्ज मिळवावे.

आपला सहकारी
महेश डी. सावंत
मानद सचिव
संचालक मंडळाच्या वतीने

मुंबई दि. १०.०४.२०२४

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड

## Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६११९, २२६१ ४०४१

Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.

**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

**सभासद बंधू आणि भगिनींनो,**

आपणांस कळविण्यात येते की, बुधवार दि. २०.१२.२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेच्या निर्णयानुसार दि. ०१ जानेवारी २०२४ पासून हमी निधी कर्जाचा व्याज दर द.सा.द.शे. ९.३०% वरून द.सा.द.शे. ९.६०% करण्यात येत आहे. तसेच, मुदत ठेवीवरील व्याजदर द.सा.द.शे. ८.२५% इतका असेल,

१. जे सभासद बदली होतात त्यांनी त्याबद्दलची माहिती त्वरीत कार्यालय प्रमुखांनी व सभासदाने सोसायटी कार्यालयास कळवावी जेणेकरून अशा सभासदांची वसुली त्या संबंधित कार्यालयास दाखविणे सोयीचे होईल.

२. काही सभासद इतर सोसायटीचे सभासद असतात त्यांनी सोसायटी कडून कर्ज घेताना त्या **"सोसायटीचा कर्ज नसल्याचा दाखला"** व मागील तीन महिन्याच्या वेतनाच्या पावत्या (Salary Slip) कर्जाच्या अर्जासोबत जोडाव्यात.

३. काही कर्मचारी सोसायटीचे सभासदत्व स्विकारून महाराष्ट्राबाहेर जातात. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरतेच मर्यादित असल्याने अशा सभासदांनी बदलीबाबतच्या सूचना त्वरीत सोसायटीच्या ई मेल आयडी (mumbaipostsociety@gmail.com) वर सोसायटी कार्यालयाला द्याव्यात व अशा सभासदांना संस्थेच्या पोटनियमातील तरतूदीनुसार सोसायटीची संपूर्ण कर्ज वसुली परतफेड करणे आवश्यक आहे.

४. सहकार खात्याच्या नियमानुसार सभासदाने कर्ज एकाच संस्थेकडून घेणे आवश्यक आहे परंतू असे आढळून येत आहे कि, काही सभासदांनी २ ते ३ सोसायट्यांचे सभासदत्व स्विकारल्याने व कर्ज घेतल्याने त्यांची कर्ज वसुली त्यांच्या पागारातून होण्यास अडचण निर्माण होत आहे त्यामुळे सर्व सभासदांनी वरील नियमांचे काटेकोरपणे पालण करावे.

५. सर्व सभासदांनी सोसायटीची नियमित वसुली त्यांच्या वेतनातूनच भरणे अनिवार्य आहे. बाहेरून वसुली भरणे टाळावे. सभासदांनी कर्ज वसुली नियमित भरावी व थकबाकी टाळून विनाविलंब सुलभतेने कर्ज मिळवावे.

**नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!**

आपला सहकारी
महेश डी. सावंत
मानद सचिव
संचालक मंडळाच्या वतीने

मुंबई दि. २०.१२.२०२३